# प्रसिध्दीपत्रक

विषय :- महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET 2019) निकालाबाबत.

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०१९ चा अंतरीम निकाल दि. ०५/०८/२०२० रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आला आहे. उमेदवारांना या परीक्षेच्या निकालाबाबत (पात्रतेसाठी) आरक्षण प्रवर्ग, वैकल्पिक विषय, अपंगत्व इ. लाभ मिळाला नसल्यास आक्षेप नोंदणीसाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देणेत आली आहे. काही व्यक्ती / संस्थेकडून अनधिकृतरित्या निकालात फेरफार करुन बनावट गुणपत्रक/प्रमाणपत्र वितरीत होत असलेबाबत तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत आहेत. सदर बाब अत्यंत गंभीर असून कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेकडून महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या नावाचा वापर कोणत्याही प्रकारे करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधिताविरुध्द कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. उमेदवारांनी अशा प्रकारच्या आमिषाला बळी पडू नये. अशा प्रकारच्या गोष्टी निदर्शनास आल्यास तात्काळ लगतच्या पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करावी.

पुणे.
दिनांक:

(तुकाराम सुपे)
आयुक्त तथा अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-1.

Scanned with CamScanner